
शरत्चंद्रंच्या देवदास या कादंबरीवर आधी नऊ चित्रपट बनलेले असूनही संजय लीला भन्सालीला पुन्हा एकदा देवदास बनवावासा वाटला. इतिहासाची पुनरावृत्ती आता शहीद भगतसिंग यांच्या बाबतीतही होतेय. भगतसिंगांच्या जीवनावर आधारित एक-दोन नव्हे तर चक्क पाच पाच चित्रपट प्रदर्शनार्थ तयार आहेत. या चित्रपटांच्या निर्मितीची रंगतदार माहिती...

□ असीम चक्रवर्ती



शहीद चित्रपटाच्या निर्मितीवेळी भगतसिंगच्या मातोश्रींनी मनोजकुमार आणि निर्माता केवल कश्यपला आशीर्वाद दिला.



भगतसिंगचे लहान बंधू कुलतारसिंग यांनी सेटवर येऊन अजय देवगणला शुभेच्छा दिल्या.


सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है, देखते हैं जोर कितना बाजू ए कातिल में है... असं ब्रिटिश सरकारला ठणकावून सांगणाऱ्या आणि २३ मार्च १९३१ रोजी हसत हसत फाशीचा फंदा आपल्या गळ्यात घालून घेणाऱ्या शहीद भगतसिंग यांचं वय अवघं २३ वर्षं पाच महिने आणि चोवीस दिवस इतकंच होतं. आजही तमाम भारतीय जनतेने (आमचे महान नेते वगळता) त्यांच्या स्मृती आपल्या हृदयात जपून ठेवल्या आहेत. मग आमच्या हिंदी चित्रपटसृष्टीने तरी याबाबतीत का मागे राहावं? देशभक्तीपर गीतांत त्यांच्या महान कार्याचा उल्लेख आम्ही आवर्जून करतो. त्यांच्या अनमोल वचनांनाही आमच्या चित्रपटांतून अधूनमधून उजाळा दिला जातो. का कोण जाणे पण अचानक निर्मात्यांना शहीद भगतसिंगांचं जीवन प्रेरणादायी का वाटलं? सध्या इंडस्ट्री 'इन्कलाब जिंदाबाद' च्या घोषणांनी दुमदुमली आहे. भगतसिंगांच्या जीवनावर आधारित पाच पाच चित्रपट एकावेळी प्रदर्शित होतायत याला आपण योगायोग म्हणायचं की आणखी काही? टिप्स प्रस्तुत आणि तौराणीबंधू निर्मित राजकुमार संतोषीचा *द लेजेन्ड ऑफ शहीद भगतसिंग*, सनी देओल निर्मित, गुड्डू धनोआ दिग्दर्शित *२३ मार्च १९३१ शहीद*, निर्माता इक्बाल धिलोनचा सुकुमार नायर दिग्दर्शित *शहीद-ए-आझम*, प्रसिद्ध पंजाबी पॉप गायक हरभजनसिंग मानची मुख्य भूमिका असलेला तरुण वाधवाचा *शहीद भगतसिंग* आणि नवोदितांना घेऊन ज्येष्ठ निर्माते रामानंद सागर यांचा *भगतसिंग*.

भगतसिंग शहीद झाले त्यानंतर २३ वर्षांनी म्हणजे १९५४ मध्ये प्रेम अबीदला घेऊन *शहीद-ए-भगतसिंग* या शीर्षकाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. नंतर १९६३ मध्ये शम्मी कपूर अभिनित *शहीद भगतसिंग* आला. पण या दोन्ही चित्रपटांची विशेष चर्चा झाली नाही. मात्र त्यानंतरचा निर्माता केवल पी. कश्यप, नायक मनोजकुमार आणि दिग्दर्शक एस. राम शर्मा या त्रिकुटाने मिळून बनवलेल्या *शहीद भगतसिंग*ला खूपच चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे आता एकाच वेळी प्रदर्शित होणाऱ्या या पाचही चित्रपटांची तुलना या *शहीद*शी होणं अपरिहार्य आहे. अचानक निर्मात्यांना शहीद भगतसिंग यांच्या जीवनावर आधारित चित्रपट बनवावंसं का वाटलं याचंही विश्लेषण करणं आवश्यक आहे. मनोजकुमारच्या शहीदमध्ये सुखदेवची भूमिका करणाऱ्या प्रेम चोप्राचं मत परखड आहे, 'भगतसिंगांचं व्यक्तिमत्त्वच असं उत्तुंग आहे की त्यांची लोकप्रियता तीळमात्र कमी होणार नाही. पण आमच्या व्यावसायिक निर्मात्यांना देशभक्तीच्या उदात्त भावनेबरोबरच इतरही मसाला भरण्याची संधी आयतीच मिळेल.'

पण मनोजकुमार मात्र निर्मात्यांच्या प्रवाहाबरोबर वाहत जाण्याच्या धोरणावर टीका करतो. 'एखादा विषय हीट ठरलाय असं पाहून सगळेच निर्माते तो विषय वेठीला धरतात. सध्या देशभक्तीवर आधारित



शहीदमध्ये मनोजकुमार



*द लेजन्ड ऑफ शहीद भगतसिंग*मध्ये अजय देवगण

चित्रपटांना मिळणारी लोकप्रियता पाहता हेच कथासूत्र बॉक्स ऑफिसवर चांगला व्यवसाय करून देणारं आहे याची निर्मात्यांनाही खात्री पटलीय. भगतसिंगांच्या जीवनात यशाच्या अनेक शक्यता आहेत. मी स्वत:ही वेगळ्या शैलीत स्क्रिप्ट लिहिण्याच्या विचारात होतो. पण देशभक्तीचं इंडस्ट्रीतलं लोण पाहता मी माझा विचार स्थगित केला. धर्मेंद्रच्या चित्रपटासाठी मनोजकुमार मार्गदर्शन करणार असल्याची मध्यंतरी चर्चा होती पण अचानक त्याने आपलं अंग काढून घेतलं.'

बी.आर. डबिंग थिएटरमध्ये *शहीद-ए-आझम*चं डबिंग करण्यात व्यग्र असलेले इक्बाल धिलोन म्हणाले, 'मला वाटतं की शहीद भगतसिंग यांच्या जीवनावर बेतलेला प्रत्येक चित्रपट यशस्वी व्हावा. माझ्या चित्रपटासाठी मी आधी गुरुदास मान यांनाच विचारलं होतं पण त्यांनी नकार दिला. ते म्हणाले की, '४५व्या वर्षी मी २३ वर्षांच्या व्यक्तिरेखेला न्याय देऊ शकणार नाही. म्हणून मग नवोदित सोनू सूदला घेऊन मला हा चित्रपट बनवावा लागला. मी भगतसिंगांशी संबंधित इतर चित्रपटांच्या स्पर्धेत नाही. सगळ्याच चित्रपटांना सारखं यश मिळावं असं मला वाटतं. मात्र हे चित्रपट एकाच वेळी प्रदर्शित न होता थोड्या थोड्या कालावधीनंतर प्रदर्शित झाले तर बरं.'

पण असं होणार नाही. *द लेजन्ड ऑफ भगतसिंग*चे निर्माता रमेश तौराणी यांच्या मते हा निव्वळ योगायोग आहे. ते म्हणाले, '*लज्जा*नंतर संतोषी *भगतसिंग* बनवणार असल्याचं त्यांनी अगोदरच जाहीर केलं होतं. त्यामुळे ज्यावेळी सनीने *भगतसिंग*ची घोषणा केली त्यावेळी आम्ही त्यांच्याशी संपर्क साधून दोन स्वतंत्र चित्रपट बनवण्याऐवजी संयुक्तपणे एकच चित्रपट बनवण्याचा प्रस्ताव ठेवला. पण त्यांच्या अटी मान्य करणं आम्हाला अशक्य होतं. आम्ही आमच्या प्रोजेक्टमध्ये बरीच गुंतवणूक केली होती. त्यामुळे शेवटी जो चित्रपट अधिक प्रामाणिकपणे आणि संपूर्ण निष्ठेने बनवला असेल तो चालेल असा विचार करून आम्ही स्वतंत्रपणे चित्रपट निर्मिती सुरू केली. संतोषी आणि सनी दोघांचेही चित्रपट २१ जून रोजी प्रदर्शित होतायत. त्यामुळे खरी चुरस या दोघांमध्ये असेल.'

तौराणी असं म्हणत असले तरी आपलाच चित्रपट सर्वश्रेष्ठ असल्याचा दावा पाचही निर्माते करताहेत. *लज्जा*च्या वेळी दिलेल्या मुलाखतीत संतोषी म्हणाला होता, 'मनोजकुमारचा *शहीद* माझ्या मते उत्कृष्ट चित्रपट होता. तरीही मी तो संपूर्ण होता असं म्हणणार नाही. गेली अनेक वर्षं भगतसिंगांच्या जीवनावर मी सखोल संशोधन करतोय. आमच्या स्क्रिप्टवर मनोजकुमारच्या चित्रपटाचा अजिबात प्रभाव नाही. आमचं कथानक अनेक तथ्य आणि इतिहास यांची शहानिशा केल्यानंतरच आकाराला आलंय. भगतसिंगांचे छोटे भाऊ ७१ वर्षीय कुलतारसिंग यांनी आमचं कथानक अधिक वास्तववादी असल्याचं शिक्कामोर्तब केलं आहे. या चित्रपटाची निर्मिती स्वत:च करण्याचा माझा विचार होता. पण *गदर* आणि *इंडियन*ला मिळालेलं यश पाहता सनी देओलला देशभक्ती हा विषय फायदेशीर ठरू लागल्याचं माझ्या लक्षात आलं. किती निर्माते याच विषयावर चित्रपट बनवतायत त्याच्याशी माझा संबंध नाही. भगतसिंगांच्या आयुष्यातील अनेक अनुल्लेखित प्रसंगांचा समावेश आमच्या चित्रपटात करण्यात आला आहे.'

संतोषी आणि सनी दोघांनीही सेटवर चित्रीकरण केलं आहे. दोघांनीही भव्यतेवर


क्रांतिकारकांवरील चित्रपट

सध्या शहीद भगतसिंग यांच्यावर बनवण्यात येणाऱ्या चित्रपटांची जोरदार चर्चा चालू आहे. भगतसिंगांप्रमाणेच चंद्रशेखर आजाद, सुभाषचंद्र बोस, खुदिराम बोस यांच्यासारख्या अनेक क्रांतिकारकांनीही देशासाठी आपल्या प्राणांचं बलिदान दिलं आहे. मग आपण त्यांना विसरलोय का? मनोजकुमारच्या *शहीद*मध्ये चंद्रशेखर आजादची भूमिका साकारणाऱ्या स्व. मनमोहन यांना घेऊन एका निर्मात्याने आजाद चित्रपट सुरू केला होता पण नंतर तो डब्यात गेला. महान क्रांतिकारी शहीद उधमसिंग यांच्यावर आधारित चित्रपटात राज बब्बरच्या अभिनयाची चार वर्षांपूर्वी बरीच प्रशंसा झाली होती.



*शहीद*मध्ये भगतसिंग बनलेला मनोजकुमार आणि निर्माता केवल कश्यप यांनी लाल बहादूर शास्त्री यांचा आशीर्वाद आणि शुभेच्छा मिळवल्या.

आता श्याम बेनेगल सुभाषचंद्र बोस आणि केतन मेहता मंगल पांडे यांच्यावरील चित्रपट लवकरच बनवणार आहेत. न्यू थिएटरच्या *पहला आदमी* (१९५०) चा खास उल्लेख करायला हवा. याचे दिग्दर्शक बिमल रॉय होते. लेखक-दिग्दर्शक रमेश सहगलनी *समाधी*मध्ये नेताजींचा उल्लेख केला होता. १९५३ मध्ये बंगाली भाषेत *सुभाषचंद्र* चित्रपट बनला होता. त्यात नेताजींच्या जीवनावर प्रकाश टाकण्यात आला होता.



*शहीद-ए-आझम*मध्ये देव गिल, सोनु सुद आणि मानव विज.

विशेष लक्ष केंद्रित केलंय. एकात भगतसिंगांची भूमिका अजय देवगण साकारतोय, तर दुसऱ्यात बॉबी देओल. संतोषीच्या चित्रपटात सुखदेव, भगतसिंग आणि राजगुरू या त्रिकुटाशी संबंधित असे प्रसंग पाहायला मिळतील जे आजवर विशेष चर्चेत नव्हते. तर आपला चित्रपट दर्शकांना चकित करणारा ठरेल असा सनीचा दावा आहे.

इकबाल धिलोन म्हणतात, 'भगतसिंग यांच्या चरित्रात नसलेल्या घटनांचा ऊहापोह करणं दर्शकांना धोका देण्यासारखं आहे. आम्ही पंजाबच्या लोकेशनवर चित्रीकरण केलं. संसद भवनात चित्रीकरणाची परवानगी मिळण्याची आम्हाला प्रतीक्षा आहे.'

मोती सागर म्हणतात, 'माझे वडील लहानपणी भगतसिंगांच्या बालसेनेत दाखल झाले होते. त्यांनी भगतसिंगांना जवळून पाह्यलं होतं. त्यांच्या स्वभावाशी ते परिचित होते. आम्ही दावा करत नाही, पण आम्हाला खात्री आहे की, आमच्या चित्रपटात दर्शकांना नक्कीच वेगळं काही पाहायला मिळेल.'

'पंजाबच्या या शूर पुत्राची व्यक्तिरेखा पंजाबी दर्शकांची मानसिकता नजरेसमोर ठेवून सादर करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. यातील घटनांची शहानिशा पंजाबमधील वयोवृद्धांच्या सल्ल्याने पडताळून पाहण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही केला.'

देशभक्तीपर चित्रपट बनवण्यात अनुभवी असलेल्या मनोजकुमारच्या मते, 'अशा चित्रपटांमध्ये वास्तव आणि त्याचं सादरीकरण याला अतिशय महत्त्व दिलं जातं. जो निर्माता या दोन्ही गोष्टींचं भान ठेवेल त्याच्या चित्रपटाला दर्शकांचा कौल लाभेल. त्या दृष्टीने संतोषीचा भगतसिंग अधिक यशस्वी ठरण्याची दाट शक्यता आहे. गुड्डू धनोआ फारसा प्रसिद्ध दिग्दर्शक नाही. इतरही तीन दिग्दर्शक लोकांच्या माहितीतले नाहीत. अर्थात, निर्णय सर्वस्वी दर्शकांच्या हाती आहे. कोणाचा चित्रपट अधिक श्रेष्ठ आहे ते जनताजनार्दनच ठरवेल. ●

भगतसिंगाची जीवनगाथाः एक दृष्टीक्षेप

शहीद भगतसिंग (संक्षिप्त आत्मकथा) :

भगतसिंगचा जन्म लायलपूर जिल्ह्यात (आता तो पाकिस्तानचा फैसलाबाद म्हणून ओळखला जातो) बंगा गावात शनिवार २७ सप्टेंबर १९०७ रोजी झाला. वडील किशनसिंग आणि काका अजितसिंग दोघंही स्वातंत्र्यसैनिक होते. भगतसिंगांच्या जन्माच्या वेळी हे दोघेही तुरुंगात होते. संपूर्ण घराण्यातच देशभक्ती नसानसांत भिनलेली होती. भगतसिंगांच्या जन्मानंतर त्यांचे वडील आणि काका यांची जामिनावर सुटका करण्यात आली त्यामुळे त्यांचं आगमन हा शुभसंकेत मानण्यात येऊ लागला.

शिक्षणः लहानपणापासून भगत[illegible] शिक्षणात हुशार होते. त्यांचे शिक्षक किशनसिंगना सांगत, 'सरदारजी, आपका बेटा बडा होकर बहुत कुछ करेगा. इसका दिमाग बहोत तेज है. उच्च शिक्षा प्राप्त करेगा.' भगतसिंग दहा वर्षांचे असताना मोठा भाऊ जगतसिंग याचं टायफॉईडच्या आजारात निधन झालं. कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. सगळं कुटुंब लाहोरजवळील नवाकोटा गावात स्थलांतरित झालं. तिथे त्यांची जमीन होती. किशनसिंग आर्य समाजी होते त्यामुळे त्यांनी आपल्या मुलाला अँग्लो-वैदिन शाळेत दाखल केलं. त्यानंतर खालसा कॉलेजात उच्च शिक्षण घेण्याची भगतसिंगांची इच्छा होती. पण तिथे इंग्रजांचा दबदबा असल्याने त्यांनी नॅशनल कॉलेज, लाहोरला प्रवेश घेतला.

स्वातंत्र्याची लढाईः कॉलेजमध्ये शि[illegible] असतानाच कानपूर येथे आयोजित काँग्रेसच्या अधिवेशनात भगतसिंग आपले सहाध्यायी यशपाल आणि सुखदेव यांच्याबरोबर गेले होते. तेव्हापासून त्यांनाही देशभक्तीने पछाडलं. पारतंत्र्याचा तिटकारा वाटू लागला. आणि या तिटकाऱ्यातूनच स्वातंत्र्याचा वेगळा इतिहास लिहिला गेला. प्रत्येक भारतीयाला त्यांच्या बलिदानाचा सार्थ अभिमान आहे.

भगतसिंगांची वाग्दत्ता

महान क्रांतिकारक भगतसिंग यांना त्यांचे वडील किशनसिंग, काका अजितसिंग, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आजाद अशा अनेक क्रांतिकारकांचं मोलाचं सहकार्य लाभलं. भगतसिंगांच्या आईनंतर दुर्गाभाभी त्यांच्या निकट होत्या. त्यांच्या आई लहानग्या भगनसिंगांना इंग्रजांच्या जुलमी राजवटीबद्दल अनेक किस्से सांगत. दुर्गाभाभी सगळ्याच क्रांतिकारकांच्या भाभी होत्या. पण लहान भावाप्रमाणे जीव लावणाऱ्या भगतसिंगांवर त्यांचं विशेष प्रेम होतं. शिवाय काकीचाही त्यांच्यावर लोभ होता. पण त्यांच्या वाग्दत्तेविषयी विशेष उल्लेख आढळत नाही. भगतसिंगांची आई त्यांना लग्नाविषयी अनेकदा गळ घालायची. पण भगतसिंग तिला त्रोटक उत्तर देत, 'जोपर्यंत देशाला स्वातंत्र्य मिळत नाही तोपर्यंत मी तुझी इच्छा पूर्ण करू शकत नाही.'

मनोजकुमारच्या *शहीद*मध्ये हा प्रसंग खूपच संक्षेपात दाखवण्यात आला आहे. पण सनी आणि संतोषीने भगतसिंगांच्या वाग्दत्तेबद्दल वेगळाच विचार केलाय. संतोषीच्या भगतसिंग (अजय देवगण) ची प्रेयसी अमृता राव आहे. राज कंवरचा *अब के बरस* तिचा पहिला प्रदर्शित चित्रपट आहे . सनीच्या चित्रपटात ही भूमिका ऐश्वर्या रॉयने साकारली आहे. हरभजनसिंग मानच्या शहीद भगतसिंगमध्ये ही भूमिका शमा सिकंदर साकारतेय. असं म्हणतात की चित्रपट थोडा ग्लॅमरस करण्यासाठी निर्मात्यांनी वाग्दत्तेच्या भूमिकेला अधिक महत्त्व दिलं आहे.